# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# प्रादेशिक बातम्या
# सकाळी 7 वाजून 10 मि.

**दिनांक – 23.04.2021** **वार – शुक्रवार**

---

**कोरोनाचा प्रादुर्भाव पुन्हा वाढतो आहे. त्यामुळे सर्वांनीच सुरक्षा उपायांचं पालन करावं आणि पात्र नागरिकांनी न घाबरता लसीकरण करून घ्यावं, असं आवाहन करत आहोत. सुरक्षित राहा आणि कोरोना संसर्ग रोखण्यासाठी मास्क वापरा, हात वारंवार स्वच्छ धुवा आणि सुरक्षित अंतर राखा.**

---

1. विरार इथे रुग्णालयाला लागलेल्या आगीत 12 रुग्णांचा दुर्दैवी मृत्यू
2. कोविड नियंत्रणासाठी राष्ट्रीय धोरण तयार करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश.
3. देशात कोरोनाबाधितांच्या संख्येतली दैनंदिन वाढ प्रथमच 3 लाखाहून अधिक.
4. राज्यातील सर्व बिगरकृषी विद्यापीठांच्या परीक्षा होणार ऑनलाईन.
5. केंद्रीय मार्ग निधीतून राज्यातील 2040 कोटींच्या 272 रस्ते प्रकल्पांना मंजुरी.
6. ज्येष्ठ मराठी साहित्य समीक्षक आशा सावदेकर यांचं निधन आणि
7. प्रसिद्ध संस्कृत विद्वान पंडित गुलाम दस्तगीर बिराजदार कालवश.

---

**विरार आग**

नाशिक येथे ऑक्सिजनच्या गळतीमुळे 24 रुग्णांना आपले प्राण गमावल्याची घटना ताजी असतानाच विरार येथे एका रुग्णालयाला लागलेल्या आगीत 12 रुग्णांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.विरार पश्चिम इथल्या विजय वल्लभ रुग्णालयातील अतिदक्षता विभागाला मध्यरात्रीनंतर आग लागली होती. यामध्ये 12 करोनाबाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. चार मजली असणाऱ्या या रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावर ही आग लागली होती. या आगीत रुग्णालयातील 17 रुग्ण अडकले होते. दरम्यान अग्निशमन दल आणि पोलिसांनी आगीवर नियंत्रण मिळवले आणि त्यांची सुटका करण्यात आली. तर 5 रुग्णांना दुसऱ्या ठिकाणी हलवण्यात आले आहे.

**सर्वोच्च न्यायालय**

वैद्यकीय वापरासाठीचा ऑक्सिजन आणि आवश्यक औषधांचा पुरवठा, तसंच कोविड लसीकरण या विषयांवर राष्ट्रीय धोरण तयार करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने काल केंद्राला दिले. देशातील कोरोनाच्या गंभीर परिस्थितीची स्वत:हून दखल घेत सर न्यायाधीश न्यायमूर्ती शरद बोबडे यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने हे निर्देश दिले आहेत. कोविड साथी दरम्यान टाळेबंदी लावण्याबाबत उच्च न्यायालयांना न्यायालयीन अधिकार आहे का याची तपासणी केली जाईल असंही या खंडपीठानं म्हटलं आहे. सध्या दिल्ली, मुंबई, सिक्कीम, मध्य प्रदेश, कलकत्ता आणि अलाहाबाद उच्च न्यायालय कोविडशी संबंधित याचिकांवर विचार करीत आहेत, उच्च न्यायालय सर्वांच्या हिताच्या दृष्टीनं आपल्या अधिकारांचा योग्य वापर करून काम करत आहेत मात्र वेगवेगळ्या न्यायालयांच्या निकालांमुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या सर्व याचिका सर्वोच्च न्यायालयाकडे वर्ग कराव्या असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठानं दिले.

**नाशिक दुर्घटना न्यायालय**

नाशिकमधल्या ऑक्सिजन गळतीमुळं झालेल्या दुर्घटनेची मुंबई उच्च न्यायालयानं स्वत: हून दखल घेत राज्य सरकारकडून अहवाल मागवला आहे. चार मे पर्यंत हा अहवाल सादर करायचा असून त्यात या दुर्घटनेमागील कारणांचं स्पष्टीकरण असावं, असे आदेश न्यायालयानं ॲडव्होकेट जनरल आशुतोष कुंभकोणी यांना दिले आहेत. नाशिकमधील डॉ. झाकीर हुसेन रूग्णालयात 21 एप्रिल रोजी ऑक्सिजन टाकीतून गळती झाल्याने 24 रुग्णांचा मृत्यू झाला होता

**देश कोविड**

कोरोनाबाधितांच्या दैनंदिन वाढीची संख्या काल 3 लाखाच्या पुढे गेली. काल सकाळी संपलेल्या चोवीस तासांत 3 लाख 14 हजार नव्या रुग्णांची नोंद झाल्याचं आरोग्य मंत्रालयानं कळवलं आहे. यासह देशातील एकंदर कोरोना बाधितांची संख्या एक कोटी 59 लाखांच्या पुढे गेली आहे. देशात सध्या 22 लाख 91 हजार रुग्णांवर उपचार सुरू आहे. कोविड मुळे एकाच दिवसात झालेल्या मृत्यूंची काल नोंद झालेली संख्याही उच्चांकी असून काल सकाळपर्यंतच्या 24 तासात 2 हजार 104 जणांचा मृत्यू झाला. देशात कोविड मुळे झालेल्या एकंदर मृत्युंची संख्या एक लाख 84 हजार झाली आहे. राज्यात दैनंदिन कोरोनाबाधितांच्या संख्येत घट होत नसली तरी बरे होणाऱ्या रुग्णांच्या संख्येतील वाढीमुळे उपचाराधिन रुग्णसंख्येतल्या वाढीची गती काहीशी कमी झाली आहे. काल संध्याकाळपर्यंतच्या 24 तासात राज्यात 67 हजार 13 नवे कोरोनाबाधित आढळले तर 62 हजार 298 रुग्ण बरे झाले. काल राज्यात 568 कोरोनाबाधितांचा मृत्यू झाला. सध्या राज्यातील उपचाराधीन रुग्णांची संख्या 6 लाख 99 हजार 858 आहे. राज्यातील कोविड स्थितीबाबत सविस्तर बातम्या आपण 10 वाजून 10 मिनिटांनी आमच्या कोरोना महाराष्ट्र या विशेष बातमीपत्रात ऐकू शकाल.

**कोरोना लसीकरण**

देशात आता पर्यंत कोरोना प्रतिबंधक लसीच्या 13 कोटी 23 लाख 30 हजार 644 मात्रा देण्यात आल्या आहेत. कोविड 19 लसीकरणाचा तिसरा टप्पा 1 मेपासून सुरू होत असून 18 वर्षांवरील सर्वजण लस घेण्यासाठी पात्र आहेत. त्यांना येत्या 28 तारखेपासून कोविन ॲपवर नोंदणी करता येईल.

**महाकार्गो**

टाळेबंदीच्या काळात विपरित परिस्थितीतही राज्य परिवहन महामंडळाला हात देणारी मालवाहतूक आता महाकार्गो या नावानं नव्या रंगरुपात सज्ज होत आहे. ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**गेल्या वर्षभरापासून लॉकडाऊनसदृश स्थितीतही एसटीच्या मालवाहतूक सेवेनं भरीव कामगिरी करत तब्बल 50 कोटी रुपयांचा महसूल मिळवला. राज्य सरकारच्या विविध विभागांतील एकूण मालवाहतुकीच्या 25 टक्के मालवाहतूक एसटी महामंडळाला देण्याचा निर्णय अडचणीच्या काळात वरदान ठरला. अत्यंत परवडणाऱ्या दरात मालवाहतूक असल्यामुळे सर्वसामान्यांनाही या सेवेचा थेट लाभ घेता आला. आता या मालवाहतूक सेवेचं नामकरण महाकार्गो असं केलं आहे. मालवाहतुकीच्या वाहनांची रंगसंगती बदलण्यात येणार असून त्यावर ब्रँडनेमही असणार आहे. सर्व वाहनांची रंगसंगती सारखी असावी, यासाठी मालवाहतुकीच्या वाहनांचं चित्र सर्व विभागांना देण्यात आलं आहे. सर्व विभागांनी विभागीय या चित्रानुसार एक महिन्याच्या आत काम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परिवहन महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयात मालवाहतुकीसाठीच्या व्यवहारांसाठी 022-23024068 या क्रमांकावर सकाळी 10 ते सायंकाळी 05.30 या कालावधीत हेल्पलाइन सुरू केली आहे. याचा उपयोग सर्वसामान्यांनाही करता येणार आहे. भविष्यात मालवाहतुकीच्या माध्यमातून उत्तम आर्थिक पर्याय मिळेल असं मत महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेस संघटनेचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी व्यक्त केलं. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून भूषण राजगुरु.**

**विद्यापीठ परीक्षा**

राज्यातील सर्व 13 बिगरकृषी विद्यापीठातील परीक्षा ऑनलाईन पद्धतीनं घेतल्या जाणार असल्याची घोषणा उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी काल केली. सामंत यांनी विद्यापीठांच्या कुलगुरुंसोबत परीक्षांसंदर्भात एक बैठक घेतली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात लागू करण्यात आलेल्या निर्बंधांमुळे ऑफलाईन परीक्षा घेणं शक्य नसल्याचं कुलगुरुंनी या बैठकीत सांगितलं. त्यामुळे आता ऑनलाईन परीक्षेसाठी विद्यापीठांनी तातडीने यंत्रणा तयार करावी असे निर्देश सामंत यांनी दिले. आगामी शैक्षणिक वर्षाच्या नियोजनासाठी येत्या 15 दिवसात पुन्हा कुलगुरुंसोबत बैठक घेतली जाईल असंही सामंत यांनी सांगितलं.

**पदवीप्रदान**

येत्या 30 तारखेला नियोजित करण्यात आलेला डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचा 35 वा दीक्षांत समारंभ पुढे ढकलण्यात आला आहे. हा समारंभ दूरदृष्य पद्धतीनं करण्यासाठी रीतसर परवानग्या सुद्धा घेण्यात आल्या होत्या. काल विद्यापीठ विद्या परिषद आणि कार्यकारी परिषदेनं हा दीक्षांत समारंभ पुढे ढकलण्या बाबत एकमतानं निर्णय घेण्यात आला आहे अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.सुरेंद्र काळबांडे यांनी दिली.

**महाविद्यालय पुरस्कार - गडचिरोली**

गडचिरोलीसारख्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागात कुरखेडा इथल्या श्री. गोविंदराव मुनघाटे कला आणि विज्ञान महाविद्यालयाला 2020-21 या वर्षाचा बेस्ट अन्डर ग्रॅज्युएट कॉलेज ऑफ महाराष्ट्र फॉर इंडस्ट्री इंटरफेस हा पुरस्कार जाहीर झाला आहे. ऐकूया अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून......

**कुरखेडा परिसर अतिदुर्गम, आदिवासीबहुल आणि उद्योगविरहीत आहे. या भागात मुनघाटे महाविद्यालयानं केंद्र सरकारच्या पंतप्रधान कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत काही अभ्यासक्रम सुरु केले. महाविद्यालयातील रोजगार मार्गदर्शन केंद्राच्या वतीने केंद्र सरकारच्या उन्नत भारत अभियानांतर्गत दत्तक गावातील शेतकऱ्यांसाठी मधमाशा पालन प्रशिक्षण, जलव्यवस्थापन कार्यशाळा, वैदू संमेलन, मृदसंधारण प्रशिक्षण असे अनेक उपक्रम राबवले. यामुळे आदिवासी मुला-मुलींना गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. याची नोंद सीईजीआर या राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेनं घेतली. देशातील अनेक कुलपती आणि कुलगुरु यांच्यासह देशभरातील अनेक शिक्षणतज्ज्ञ या संस्थेचे सभासद आहेत. सीईजीआर संस्था गेल्या 13 वर्षांपासून राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती, संस्था, विद्यापीठे, महाविद्यालये यांना दरवर्षी पुरस्कार प्रदान करते. नुकतंच 19 एप्रिलला आभासी पद्धतीने हा पुरस्कार वितरण समारंभ पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. आकाशवाणी बातम्यांसाठी गडचिरोलीहून जयंत निमगडे**

**रस्ते गडकरी**

राज्यातील 2040 कोटींच्या 272 प्रकल्पांना काल केंद्रीय महामार्ग वाहतूक आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी मंजुरी दिली. विदर्भातील 1028 कोटींच्या रस्त्यांच्या 77 प्रकल्पांचा यात समावेश आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं महाराष्ट्र शासनाला या मंजूर कामाची यादी पाठविली असून केंद्रीय मार्ग निधी 2021 अंतर्गत ही सर्व कामं होणार आहेत. नागपूर शहराला 12 प्रकल्प मिळाले असून या प्रकल्पांची किंमत 145 कोटी 69 लाख रुपये आहे.

**जलजीवन अभियान**

जलजीवन अभियाना अंतर्गत चालू आर्थिक वर्षात 27 लाखांपेक्षा अधिक नळजोडण्या देण्याची योजना राज्य सरकारनं आखली आहे. काल सरकारनं जलशक्ती मंत्रालयाला याबाबतचा प्रस्ताव सादर केला. 13 जिल्हे आणि 12 हजार 839 गावांमध्ये शंभर टक्के घरांमध्ये नळजोडणी देण्याची सरकारची योजना आहे.

**हापूस**

रत्नागिरी हापूसची भेसळ आता क्यूआर कोड वापरून रोखणार असल्याची माहिती कोकण हापूस आंबा उत्पादक आणि उत्पादक विक्रेते सहकारी संस्थेचे डॉ. विवेक भिडे यांनी काल दिली. आंब्यावर चिकटवलेला स्टिकर आपल्या मोबाइलवर स्कॅन केल्यानंतर आंबा कुठच्या बागेतून आला आहे, त्या बागेला जीआय प्रमाणपत्र आहे का, तो पाठवणाऱ्या शेतकऱ्याचं नाव, शेतकऱ्याचा संपर्क क्रमांक, पॅकिंग पद्धत, आंबा पिकवणारी यंत्रणा कशी आहे, आंबा कोणत्या दिवशी पॅक केला याची माहिती मोबाइल स्क्रीनवर दिसणार आहे. प्रत्येक आंब्यासंदर्भात अशी माहिती मिळणार आहे. त्यामुळे हापूसच्या नावाखाली होणारी ग्राहकांची फसवणूक थांबेल असं भिडे यांनी सांगितलं.

**शहीद स्मारक**

देशासाठी बलीदान दिलेल्या जिल्ह्यातील विरपुत्रांच्या स्मरणार्थ अकोला शहरात भव्य शहीद स्मारक उभारण्याचं नियोजन करण्याचे निर्देश जिल्ह्याचे संपर्कमंत्री बच्चू कडू यांनी दिले आहेत. काल नियोजन भवनात आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. जिल्ह्यातील 24 शहीदाचं सतत स्मरण व्हावं, त्यातून प्रेरणा मिळावी यासाठी शहरातील नेहरु पार्क जवळील शहिद स्मारकांचं नुतनीकरण करुन शहीदाचे पुतळे त्याच्या कार्याच्या माहितीसह उभारण्यात येणार आहे.

**पाटबंधारे**

शेतकऱ्यांना शाश्वत सिंचन सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून नदी प्रवाहाच्या मार्गात पुलवजा बंधारे उभारुन शाश्वत सिंचन सुविधा उभारण्यात येणार आहे, असं जलसंपदा राज्यमंत्री बच्चू कडू यांनी काल सांगितलं. अमरावती जिल्ह्यात चांदूर बाजार तालुक्यातील चिंचोली-

ब्राम्हणवाडा इथे राज्यमंत्री कडू यांच्या हस्ते तीन ठिकाणच्या 3 कोटी रुपयांच्या पुलवजा बंधारा निर्मितीच्या कामाचं भूमिपुजन करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते.

**मार्डीकर पुरस्कार**

नागपुरातील मार्डीकर परिवार आणि युवा झेप प्रतिष्ठानच्या वतीनं रंजना आणि भालचंद्र मार्डीकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. छत्तीसगड मधील बिलासपूर इथल्या तेजस्वीनी सेवा प्रतिष्ठानच्या सुलभा देशपांडे आणि गो-विज्ञान अनुसंधान केंद्र, देवलापारचे समन्वयक सुनिल मानसिंहका हे दोघे यंदाच्या पुरस्काराचे मानकरी आहेत.

**आदित्य ठाकरे**

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सुरु असलेल्या पावसाळापूर्व कामांसह विविध प्रकल्पांचा आढावा मुंबई उपनगर जिल्ह्याचे संपर्कमंत्री आदित्य ठाकरे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे झालेल्या बैठकीत घेतला. सर्व कामं नियोजनानुसार वेळेत आणि शक्य तेवढ्या जलदगतीनं पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

**मेट्रो भुयारीकरण**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे ऐतिहासिक वारसा इमारती जवळील मेट्रो-3 च्या पॅकेज-1 चं 96 टक्के भुयारीकरण पूर्ण करण्यात आलं आहे. काल या भुयारीकरणाचा 37 वा टप्पा पूर्ण झाला.

**निधन सावदेकर**

ख्यातनाम साहित्य समीक्षक डॉ. आशा सावदेकर यांचं काल नागपुरात निधन झालं. त्या 72 वर्षांच्या होत्या. साहित्य समीक्षणात मोलाचे योगदान देणाऱ्या डॉ. आशा सावदेकर यांचा 'कविवर्य भा.रा.तांबे यांच्या कवितेचा चिकित्सक अभ्यास' हा प्रबंध 1979 साली पुस्तकरूपानं तो प्रसिद्ध झाल्यावर साक्षेपी समीक्षक म्हणून त्या नावारूपाला आल्या. 'पु.भा.भावे: साहित्यवेध', 'भारतीय साहित्याचे शिल्पकार: ना.सी.फडके', 'मुशाफिरी' हे त्यांचे समिक्षा ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. 'कविता विदर्भाची' या त्यांनी संपादित केलेल्या ग्रंथात विदर्भातील निवडक कवींच्या वैशिष्ट्यपूर्ण कवितांचं संकलन आहे. 'युगवाणी' या विदर्भ साहित्य संघाच्या मुखपत्राच्या त्या काही काळ संपादक होत्या.

**निधन बिराजदार**

प्रसिद्ध संस्कृत विद्वान पंडित गुलाम दस्तगीर बिराजदार यांचं काल सोलापूर इथं अर्धांगवातानं निधन झालं. ते 87 वर्षाचे होते. बिराजदार हे मूळचे सोलापूरच्या अक्कलकोट तालुक्यातले. सोलापुरातील महानगर पालिकेच्या संस्कृत शाळेत त्यांचे शिक्षण झालं. पुढे त्यांनी वेदांचा अभ्यास केला आणि त्यांत प्रावीण्य मिळवलं. बिराजदार यांनी मुस्लिमबांधवांचा कुराण-शरीफ हा पवित्र ग्रंथ संस्कृतमध्ये भाषांतरित केला आहे. वेदादि-शोधबोध, मुस्लिम-संस्कृत-सेवका: 'विश्वभाषा' सम्पादकीयमौक्तिकानी, अशी त्यांची ग्रंथ संपदा आहे. बिराजदार यांना राष्ट्रीय-शिक्षक-पुरास्कार, महाराष्ट्र राज्य-संस्कृत-पण्डित-पुरस्कार अशा 18हून अधिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं आहे.राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी पंडित बिराजदार यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**हवामान**

राज्यात सर्वत्र हवामान कोरडं आहे. तापमानातही काल फारशी वाढ झाली नाही. आज आंणि उद्याही या हवामाना फारसा बदल संभवत नाही असं वेधशाळेनं कळवलं आहे.